अनेकांत एज्युकेशन सोसायटीचे,

# तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय बारामती

(कला, विज्ञान आणि वाणिज्य)

(स्वायत्त)

## मराठी विभाग

## 'उत्सव शब्दांचा'

## वाचन कार्यशाळा-भिलार

## अहवाल

दिनांक: १५/१०/२०२२

डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जन्मदिनी वाचन प्रेरणा दिनानिमित पुस्तकांच्या गावात- भिलार येथे 'उत्सव शब्दांचा' या वाचन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. पुस्तकांचा गाव -विश्वस्त संस्थेच्या वतीने ही कार्यशाळा 'उत्कृष्ट कलानिर्मितीसाठी तरुण कलाकारांनी काय वाचायला हवे?' या विषयावर संपन्न झाली. आपल्या महाविद्यालयातील मराठी विभाग व सांस्कृतिक विभागातील सहा विद्यार्थी व दोन प्राध्यापक सहभागी झाले होते. साहित्य, नाटक, एकांकिका, चित्रपट व मालिका या क्षेत्रातील मान्यवरांनी या कार्यशाळेत मार्गदर्शन केले. ज्येष्ठ साहित्यिक व अनुवादक डॉ. उमा कुलकर्णी यांनी कार्यशाळेचे उद्घाटन केले. याप्रसंगी त्यांनी बालपणीच्या चांदोबा वाचल्याच्या आठवणी सांगितल्या. वाचन हा एक चैतन्यदायी आणि सर्जनशील अशी प्रक्रिया आहे. हे तरुणांनी लक्षात घ्यावे व पठडीबाज व साचेबद्ध वाचन न करता सजगपणे- आवडीचे वाचन करावे तसेच आपल्या आवडीप्रमाणे काही गोष्टींच्या कुतूहलापोटी अनुवाद करावा. याविषयी त्यांनी मार्गदर्शन केले. या सत्रात पुरुषोत्तम बेर्डे, लेखिका मुग्धा गोडबोले, दिग्दर्शक अभिजीत दळवी ,यांनी आम्ही काय वाचतो? कसे आणि कशासाठी वाचतो? याबाबतीत आपले अनुभव कथन केले. मुक्तमंथन सत्रात नाट्य प्रशिक्षक व दिग्दर्शक योगेश सोमण आणि मिलिंद शिंत्रे यांनी नाटकाकडे बालपणीच रुची कशी होती? याविषयीच्या रम्य आठवणी कथन केल्या.कार्यशाळेत अभिवाचनानंतर प्रश्नोत्तरातून अनेक महत्वपूर्ण घटकांवर त्यांनी मार्गदर्शन केले. समारोप सत्रात पुस्तकांचा गाव विश्वस्त संस्थेचे -दिग्दर्शक अभिराम भडकमकर यांनी कार्यशाळेचा आढावा घेतला. याप्रसंगी जेष्ठ लेखिका मंगला गोडबोले यांचे मार्गदर्शनपर व्याख्यान झाले. विश्वस्त श्री. गिरीश प्रभुणे, भिलारचे सरपंच, उपसरपंच, खजिनदार, पुस्तक- पालक आदी मान्यवर या कार्यशाळेत उपस्थित होते.श्री.विनय मावळणकर यांनी या वाचनकार्यशाळेचे संयोजन केले. वाचन कार्यशाळेतून सकारात्मक वाचनदृष्टी मिळाली.वाचन कार्यशाळा अतिशय उत्तम व फलदायी झाली.वाचन कसे करावे?,कायवाचावे?,वाचनाचे फायदे काय? आपली वाङ्मयीन आवड कशी जोपासलीजाते? तसेच नाट्यक्षेत्रात उत्तुंग भरारी घेतलेले अभिनेते कसे घडले?त्यांनी काय कष्ट घेतले? लहानपणी वाचनाची गोडी त्यांना कशी लागली? वाचनामुळे त्यांचे व्यक्तिमत्त्व कसे घडले? अभिवाचन कसे करावे? भाषा प्रभुत्व,संवादफेक,अभिनयाची अंगे इ. अनेक विषयांचे सखोल मार्गदर्शन या कार्यशाळेत मिळाले. आपल्या महाविद्यालयातील विठ्ठल कसबे, मयूर ठाकूर,निरंजन घुगे,सौरभ पांढरे,अंगद हंडाळ,तेजस्विनी तांदळे या विद्यार्थ्यांनी पुस्तकांच्या दालनांना भेट दिली.

मा.प्राचार्यांना अहवाल सादर.....

प्रा. राजेंद्र कंडरे
सांस्कृतिक विभाग

डॉ.सीमा नाईक-गोसावी
मराठी विभाग प्रमुख

Scanned with CamScanner

Scanned with OKEN Scanner

डॉ. सीमा नाईक - गोसावी
मराठी विभाग प्रमुख
दि. १२।१०।२०२२

प्रति,
मा. प्राचार्य,
तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय,
बारामती.

विषय : पुस्तकांचा गाव विश्वस्त संस्था आयोजित उत्सव शब्दांचा वाचन कार्यशाळेस उपस्थित राहणेबाबत.

आदरणीय सर,

शनिवार दि. १५।१०।२०२२ रोजी पुस्तकांचा गाव विश्वस्त संस्थेने आयोजित 'उत्सव शब्दांचा वाचन कार्यशाळा' आयोजित केली आहे. उत्कृष्ट कलानिर्मितीसाठी तरुण कलाकारांनी काय वाचायला हवे? यासंदर्भातील ही कार्यशाळा असून आपल्या महाविद्यालयातील पुढील प्राध्यापक व विद्यार्थ्यांना उपस्थित राहण्याची परवानगी मिळावी, ही विनंती.

- या वाचन कार्यशाळेस जाणेसंदर्भात मार्गदर्शनही मिळावे ही विनंती.

सहभागी सदस्य

१) डॉ. सीमा नाईक - गोसावी
२) प्रा. राजेंद्र कुंडरे
३) ~~सौ. सुषमा संगई~~ ऐवजी तेजस्विनी तांदळे
४) निरंजन घुगे S.Y.BSC
५) सौरभ पांढरे M.Sc
६) ~~तृप्ती माने~~ M.com ऐवजी अंगद हंडाळ
७) विठ्ठल कसबे T.Y.B.A.
८) मयूर ठाकर T.Y.B.A.

तरी वरील सदस्यांना जाण्यासंदर्भात मार्गदर्शन व्हावे ही विनंती कळावे

आपली विश्वासू,

[signature]

डॉ. सीमा नाईक - गोसावी

CS Scanned with CamScanner

...google.com/mail/u/0/#inbox/FMfcgzGtvKSjjvZVDqcKFTvLlifTnbKr?projector=1&messagePartId=0.1

Scanned with OKEN Scanner



Scanned with OKEN Scanner

CamScanner 09-21-2023 13.01.02_2.jpg



Scanned with OKEN Scanner